प्रस्तावना:-

**विषय:-**. **भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील वंजारपट्टीनाका येथे उड्डाणपूलवरील रस्ता मास्टिक अस्फाल्ट आणि बी.एम पद्धतीने दुरुस्ती करणे.**

**भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील वंजारपट्टीनाका येथे उड्डाणपूलवरील रस्ता मास्टिक अस्फाल्ट आणि बी.एम पद्धतीने दुरुस्ती करणे..** कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. २९,९४,३८७/- मात्रच्या प्रस्तावास मा. आयुक्त सो यांची मंजुरी प्राप्त झाली असुन उक्त कामास मा. प्रशासकीय ठराव क्रं.२२९ दिनांक ११/७/२०२३ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. २९,९४,३८७/- ई-निविदा सुचना क्र.७३/९३०७८९(२०२३-२४) दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.०१/८/२०२३ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी निविदाकारांची नावे निविदेतील दर एकुण 2 **निविदाकार** खालील प्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | निविदाकार | दर |
|---|---|---|
| १ | **मे. झा पी अँड कं. उल्हासनगर** | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.३९०% टक्के कामी दराने** |
| २ | मे. तुषार मोहन चौधरी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०००% टक्के जादा दराने |

वरील पैकी **मे. झा पी अँड कं.,उल्हासनगर** यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा **६.३९०%** कमी दराने म्हणजेच रक्कम रु. **२८,०३,०४६** (अक्षरी अठ्ठावीस लक्ष तीन हजार सेह चाल मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.: - 263

दिनांक :- 04/10/2023

**मे.झा पी अँड कं,उल्हासनगर** यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा **६.३९०%** कमी दराने म्हणजेच रक्कम रु. **२८,०३,०४६** (अक्षरी अठ्ठावीस लक्ष तीन हजार सेह चाल मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी **अजय वैद्य**, प्रशासक तथा आयुक्त **भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील वंजारपट्टीनाका येथे उड्डाणपूलवरील रस्ता मास्टिक अस्फाल्ट आणि बी.एम पद्धतीने दुरुस्ती करणे.** कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे.झा पी अँड कं,उल्हासनगर** यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका